# <u>रमाचे मित्र</u>



रमा ही एक छोटीशी आणि गोड मुलगी होती. ती तिच्या बाबांबरोबर एका <u>बेटावर</u> राहायची. त्या बेटावर माणसांची <u>वसती</u> नव्हती. त्या बेटाबद्दल कोणाला काही माहिती सुद्धा <u>नव्हती</u>.

रमाचे केस <u>काळेभोर</u> आणि <u>कुरळे</u> होते. तिचे डोळे <u>तपकिरी</u> होते. रमा गोरी गोरी होती. तिच्या गालांवर छान <u>खळी</u> पडायची.

त्या बेटावर रमाशी खेळायला इतर मुले-मुली नव्हती. पण रमाला त्याचे फार वाईट वाटायचे नाही. तिने बेटावरील प्राण्यांनाच आपले मित्र बनवले.

एक छोटासा <u>सरडा</u> तिचा मित्र झाला. तो हिरव्या रंगाचा होता - म्हणून त्याचे नाव ठेवले रंगा. रमा आणि रंगाचा आणखी एक मित्र होता. तो होता <u>पक्षी</u>. त्याचा रंग होता <u>करडा</u> - म्हणून त्याचे नाव ठेवले करडू. रमा, रंगा आणि करडू यांना आणखी एक मित्र मिळाला. ते होते एक माकड. त्या माकडाचे नाव होते बन्सी. बन्सी लाल रंगाचा होता.

रमा आणि तिचे मित्र बेटावर खूप मज्जा करायचे.

~~~

1. योग्य रंग वापरून चित्र रंगवा.

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH
~~~

2. धड्यातील कोणतेही पाच नवीन शब्द वापरून वाक्ये तयार करा.

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

3. रमा कुठे राहायची?

--------------------------------------------------------------------------------------------

4. रमाचे मित्र कोण कोण होते?

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

5. क्रीयापदाचे योग्य रूप निवडा

अ) अंजू एक गोड मुलगी (होता / होती).

आ) तो मुलगा शाळेत (जाते / जातो).

इ) कुत्रा जोरात (पळतो / पळते).

ई) मांजर उंच उडी (मारतो / मारते).

उ) सरडा सरसर झाडावर (चढतो / चढते).

ऊ) आई मला खाऊ (देतो / देते).

6. विचार करा आणि सांगा: तुम्ही जर बेटावर एकटेच असलात तर काय काय कराल?

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH